मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पिंपरी-चिंचवडमध्ये आता 'बॅटरी क्रांती'!

## चिखलीत ८०० कोटींचे संशोधन केंद्र; सीओईपी-जेएसडब्ल्यूचा करार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' बनवण्याच्या संकल्पाला आता प्रगत संशोधनाची जोड मिळणार आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांच्यात चिखली येथील रिसर्च पार्कमध्ये स्वदेशी बॅटरी संशोधन व विकास केंद्र उभारण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. ८०० कोटींहून अधिक गुंतवणूक प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी स्वागत केले आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. चिखलीतील हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक आणि औद्योगिक क्षमतेला नवी दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. करारावर सीओईपीतर्फे कुलसचिव डॉ. डी. एन. सोनावणे आणि जेएसडब्ल्यू समूहातर्फे कार्यकारी उपाध्यक्ष नरेश ललवाणी यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

प्रस्तावित केंद्रात लिथियम-आयन, सोडिअम-आयन आणि इतर प्रगत तंत्रज्ञानावर आधारित बॅटरी सेलचे संशोधन, प्रोटोटायपिंग व प्रमाणीकरण होणार आहे. केंद्र दोन टप्प्यांत विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून एक हजार रोजगारसंधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना आणि युवा अभियंत्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर प्रत्यक्ष काम करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या भागीदारीबाबत जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांनी, "सेल हे या शतकातील नवीन इंधन असून हे सेल भारतातच तयार करण्याची वेळ आली आहे," असे म्हटले आहे. सीओईपीसोबतची भागीदारी उद्योग, संशोधन आणि शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' म्हणून विकसित करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ तसेच सीओईपी आणि आयआयएम नागपूरच्या शैक्षणिक संधी शहरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला. आता चिखलीतील बॅटरी संशोधन केंद्रामुळे या संकल्पात उद्योगाशी जोडलेल्या संशोधनाची भर पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वदेशी बॅटरी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी झालेल्या भागीदारीबद्दल लांडगे यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्सचे अभिनंदन केले. प्रस्तावित गुंतवणुकीतून दर्जेदार संशोधन, कौशल्यविकास आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

> "पिंपरी-चिंचवडची ओळख औद्योगिक शहर म्हणून आहे. आता या औद्योगिक सामर्थ्याला शिक्षण आणि स्वदेशी संशोधनाची जोड देण्याचा आमचा संकल्प आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चिखलीतील हा प्रकल्प युवा अभियंत्यांसाठी नवी संधी निर्माण करेल. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांचे मनापासून आभार आहेत. प्रस्तावित गुंतवणुकीतून स्थानिक युवकांना कौशल्य आणि रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी निर्माण होतील, असा विश्वास आहे."
>
> –महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## संजय कुलकर्णी, योगेश आल्हाट आणि ऋषिकांत चिपाडे यांच्या अडचणीत भर!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारत दुर्घटनेप्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या महापालिकेच्या तीन अधिकाऱ्यांच्या अडचणी आता आणखी वाढण्याची शक्यता आहे. सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट आणि अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्याविरोधात खातेनिहाय विभागीय चौकशी सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.**




मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची प्रशासकीय इमारत ८ जुलै रोजी अचानक कोसळली होती. या भीषण दुर्घटनेत तब्बल नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने पर्यावरण विभागातील सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट आणि अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांना निलंबित केले होते.

दुर्घटनेनंतर या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १३ जुलै रोजी चौकशी समिती स्थापन केली होती. विभागीय आयुक्त शीतल उगले-तेली यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, मुंबई आयआयटीचे प्रा. डी. एन. सिंग तसेच पर्यावरण आणि घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ अनिलकुमार दीक्षित यांचा समावेश करण्यात आला होता.

महापालिकेच्या अंतर्गत चौकशीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. कर्तव्यात गंभीर स्वरूपाची निष्काळजी, शासकीय कामकाजातील हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामाला संरक्षण देणे तसेच पर्यावरणीय नियमांचे पालन न करणे, अशा स्वरूपाचे आक्षेप चौकशीत नोंदविण्यात आले आहेत.

या प्रकरणात सामान्य प्रशासन विभागाने तिन्ही अधिकाऱ्यांना दोषारोपपत्र बजावून खुलासा मागविला होता. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेले खुलासे प्रशासनाच्या दृष्टीने समाधानकारक नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता केवळ निलंबनापुरती कारवाई मर्यादित न राहता तिन्ही अधिकाऱ्यांविरोधात खातेनिहाय विभागीय चौकशीची पुढील प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

विभागीय चौकशीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांवरील आरोप, त्यांची जबाबदारी आणि दुर्घटनेशी संबंधित प्रशासकीय निर्णयांची सखोल तपासणी केली जाणार आहे. चौकशीदरम्यान आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. यामध्ये सेवेतून बडतर्फीपासून अन्य शिस्तभंगाच्या कारवाईपर्यंतच्या शिक्षेचा समावेश असू शकतो.

# रविंद्र चव्हाणांकडून राहुल कलाटेंचे कौतुक!

## ६४ शिबिरांतून ८५०० लाभार्थ्यांना लाभ; जनकल्याण उपक्रमाचे प्रदेशाध्यक्षांकडून कौतुक

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. मात्र, या योजनांचा केवळ प्रचार न करता त्यांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे, असे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. वाकड येथे भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या लाभार्थी शिबिराचे त्यांनी कौतुक केले.**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत वाकड येथे लाभार्थी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आला. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की, सरकार योजना बनवते; मात्र त्या योजना यशस्वीपणे जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्यांची अंमलबजावणी करून घेणे हे लोकप्रतिनिधींचे काम आहे. केवळ योजनेचा प्रचार करून उपयोग नाही. योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळाल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हीच लोकप्रतिनिधीच्या कामाची खरी ताकद आहे.

राहुल कलाटे यांच्या जनकल्याण शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक करताना चव्हाण यांनी सांगितले की, तंत्रज्ञान आणि प्रभावी संवाद यंत्रणांचा मेळ घालून कलाटे यांनी हा उपक्रम राबविला आहे. आतापर्यंत त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून ६४ हून अधिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, ८५०० हून अधिक लाभार्थ्यांपर्यंत विविध योजना आणि सुविधांचा लाभ पोहोचविण्यात आला आहे. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याच्या या प्रयत्नाचे त्यांनी कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः 'सेवा' भावनेतून काम करतात. त्याच विचारांचा पायंडा पुढे नेत राहुल कलाटे यांच्या माध्यमातून नागरिकांसाठी हा उपक्रम राबविला जात असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. आपल्या समस्या ऐकून घेण्यासाठी हक्काचे माणूस उपलब्ध आहे, हा विश्वास नागरिकांना देणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राहुल कलाटे यांनी सांगितले की, नागरिकांनी आपल्या समस्या घेऊन लोकप्रतिनिधींकडे येणे स्वाभाविक आहे. मात्र, जनसंपर्क कार्यालय नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'जनकल्याण शिबिर' हा उपक्रम सुरू करण्यात आला. गेल्या सहा महिन्यांपासून वाकड परिसरातील सोसायट्या, गावठाण आणि वस्ती भागात या शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

या शिबिरांमध्ये कोणतेही सेवा शुल्क न आकारता नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती, आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन आणि पात्र योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत केली जात असल्याचे कलाटे यांनी सांगितले. नागरिकांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आतापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या ६४ पेक्षा अधिक जनकल्याण शिबिरांच्या माध्यमातून साडेआठ हजारांहून अधिक नागरिकांना विविध योजना, सुविधा आणि आवश्यक मार्गदर्शनाचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे वाकड परिसरात नागरिकांच्या समस्या आणि शासकीय योजनांमधील दुवा म्हणून जनसंपर्क कार्यालयाचा उपक्रम कार्यरत असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान श्री विठ्ठल रखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद आणि सदस्यांच्या वतीने रविंद्र चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी चिंचवडचे आमदार शंकर जगताप, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, गटनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक रेश्मा भुजबळ, कुणाल वाव्हळकर, धर्मपाल तंतरपाळे, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद व सदस्य, लाभार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीट निरीक्षकांची आता तीन महिन्यांत बदली!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**शहरातील अनधिकृत बांधकामे आणि बेकायदा टप्प्यांवर सुरुवातीपासूनच नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता बीट निरीक्षकांच्या कार्यपद्धतीत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. एखाद्या भागात एकाच अधिकाऱ्याची दीर्घकाळ नियुक्ती राहू नये, यासाठी बीट निरीक्षकांची दर तीन महिन्यांनी बदली करण्याची सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली आहे. या निर्णयामुळे शहरातील अनधिकृत बांधकामांवर देखरेख करणाऱ्या बीट निरीक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे.**



महापालिका हद्दीत एखादे अनधिकृत बांधकाम सुरू झाल्याची माहिती सर्वप्रथम बीट निरीक्षकांच्या पातळीवर मिळते. बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे, संबंधित बांधकामावर कारवाईसाठी पाठपुरावा करणे आणि परिसरातील अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवणे, अशी महत्त्वाची जबाबदारी बीट निरीक्षकांवर असते.

मात्र, काही भागांत अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे बीट निरीक्षकांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेषतः एखाद्या परिसरात अधिकारी दीर्घकाळ कार्यरत राहिल्यास स्थानिक बांधकाम व्यावसायिक, व्यावसायिक प्रतिष्ठाने किंवा इतर संबंधित घटकांशी त्यांचे हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाने लक्षात घेतली आहे.

याच पार्श्वभूमीवर एकाच भागात अधिकारी वर्षानुवर्षे कार्यरत राहण्याची पद्धत बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या कार्यपद्धतीनुसार बीट निरीक्षकांची तीन महिन्यांनंतर दुसऱ्या परिसरात बदली केली जाणार आहे. त्यामुळे विशिष्ट परिसरातील स्थानिक घटकांशी दीर्घकाळ संबंध निर्माण होण्यास मर्यादा येणार असून, अनधिकृत बांधकामांवर अधिक निष्पक्षपणे देखरेख ठेवण्यास मदत होईल, अशी प्रशासनाची भूमिका आहे.

शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरू झाल्यानंतर त्याकडे सुरुवातीच्या टप्प्यात दुर्लक्ष होते. बांधकाम मोठ्या प्रमाणात उभे राहिल्यानंतर कारवाई करण्याची वेळ प्रशासनावर येते. त्यामुळे बांधकाम सुरू होताच त्याची माहिती मिळणे आणि तातडीने कारवाई करणे हा या यंत्रणेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. बीट निरीक्षकांच्या माध्यमातून ही माहिती वेळेत वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे.

दरम्यान, केवळ बीट निरीक्षकांच्या बदल्या करून अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. बीट निरीक्षकांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमित पडताळणी करणे, नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेणे आणि बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच कारवाई करणे आवश्यक ठरणार आहे.

आयुक्तांच्या या निर्णयामुळे बीट निरीक्षकांच्या कामकाजावर अधिक जबाबदारी येणार असून, 'भाग बदलला तरी कामातील हलगर्जीपणा चालणार नाही', असा संदेश प्रशासनाने दिला आहे. आता तीन महिन्यांच्या कालावधीत प्रत्येक परिसरातील अनधिकृत बांधकामांवर बीट निरीक्षक कितपत प्रभावीपणे लक्ष ठेवतात आणि वरिष्ठ प्रशासन त्यावर किती कठोरपणे कारवाई करते, याकडे लक्ष लागले आहे.

# इंद्रायणी प्रकल्पाच्या 430 कोटींच्या निविदेला भापकरांचा विरोध!

## जमीन ताब्यात नसताना वर्क ऑर्डर कशी? आयुक्तांकडे दोषींवर कारवाईची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या अमृत २.० अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या तब्बल ४३० कोटी ७५ लाख रुपयांच्या निविदा प्रक्रियेवर सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक जमीन अद्याप पूर्णपणे महापालिकेच्या ताब्यात आलेली नसताना निविदा मंजूर करून कंत्राटदाराला वर्क ऑर्डर देण्यात आल्याचा आरोप करत ही निविदा तात्काळ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**





भापकर यांच्या म्हणण्यानुसार, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी तळवडे, चिखली, बोऱ्हाडेवाडी, मोशी, डुडुळगाव आणि चऱ्होली बुद्रुक या परिसरातील सुमारे ३६ लाख १७ हजार चौरस मीटर जमीन आवश्यक आहे. मात्र, या जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून, संबंधित प्रस्ताव विविध प्रशासकीय स्तरांवर प्रलंबित असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक जागा पूर्णपणे महापालिकेच्या ताब्यात नसतानाच तब्बल ४३० कोटी ७५ लाख रुपयांची निविदा प्रक्रिया पुढे नेण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे भापकर यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अटींनुसार हा प्रकल्प दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रकल्पासाठी आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध झाली नाही किंवा विविध वैधानिक परवानग्या मिळण्यास विलंब झाला, तर काम रखडण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम प्रकल्पाच्या निर्धारित मुदतीवर होऊ शकतो. तसेच कामाला विलंब झाल्यास शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीवरही परिणाम होण्याची शक्यता असून, वाढीव खर्चाचा अतिरिक्त आर्थिक भार महापालिकेवर पडू शकतो. परिणामी नागरिकांच्या करातून जमा होणाऱ्या निधीवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा भापकर यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, प्रकल्पासाठी १०० टक्के जागा उपलब्ध असल्याची माहिती राज्य शासनाला देण्यात आल्याचा आरोपही भापकर यांनी केला आहे. प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर भूसंपादनाची प्रक्रिया प्रलंबित असेल, तर ही माहिती कोणत्या आधारावर देण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. संबंधित अधिकारी आणि प्रकल्प सल्लागारांनी महापालिका प्रशासन तसेच शासनाची दिशाभूल केली आहे का, याची निष्पक्षपणे तपासणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर मारुती भापकर यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. आवश्यक संपूर्ण जमीन महापालिकेच्या ताब्यात येईपर्यंत आणि सर्व वैधानिक परवानग्या प्राप्त होईपर्यंत ४३० कोटी ७५ लाख रुपयांची निविदा तसेच देण्यात आलेली वर्क ऑर्डर रद्द करावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. त्याचबरोबर संपूर्ण निविदा प्रक्रिया, भूसंपादनाची स्थिती आणि शासनाला देण्यात आलेल्या माहितीसंदर्भात उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

चौकशीत अनियमितता, चुकीची माहिती किंवा प्रशासनाची दिशाभूल झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी आणि प्रकल्प सल्लागारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भापकर यांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांबाबत महापालिका प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्या निविदेवर उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांबाबत प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# थेरगावात महापालिकेचे सुरक्षा शिबिर; १,५०० सफाई सेवकांची आरोग्य तपासणी!

**पुणे | प्रतिनिधी**

**शहराची स्वच्छता राखण्यासाठी दररोज प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने थेरगाव येथे 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' घेण्यात आले. 'स्वच्छता ही सेवा २०२६' अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात 'अ', 'ब', 'ड', 'ग' आणि 'ज' या पाच क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत १,५०० हून अधिक सफाई सेवकांनी सहभाग घेतला.**



थेरगाव येथील कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथे झालेल्या या शिबिरात 'अ', 'ब', 'ड', 'ग' आणि 'ज' या पाच क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत १,५०० हून अधिक सफाई सेवकांनी सहभाग घेतला होता. या शिबिराचे उद्घाटन 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांनी केले.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, सुधीर वाघमारे, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, राजू साबळे, शांताराम माने, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी आदी उपस्थित होते.

शिबिरात सफाई सेवकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची मोफत तपासणी करण्यात आली. दैनंदिन कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी संतुलित आहार, व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाच्या स्वरूपानुसार सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि आरोग्यविषयक सवयींबाबतही माहिती देण्यात आली.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, सफाई सेवकांचे काम शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याने संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने आणि आरोग्य तपासणी आवश्यक आहे. आरोग्यविषयक समस्या वेळीच लक्षात आल्यास त्यावर योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय करता येतात.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले, नियमित आरोग्य तपासणीमुळे प्राथमिक अवस्थेतील आरोग्यविषयक समस्या वेळीच निदर्शनास येतात. त्यामुळे सफाई सेवकांनी आरोग्य तपासणीसोबतच आहार आणि ताणतणावाच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष द्यावे.

यामध्ये लेखा सहाय्यक, विद्युत उपकरण दुरुस्ती, विक्री प्रतिनिधी, विद्युत वाहन तंत्रज्ञ, बँकिंग व वित्तीय सेवा, सामान्य परिचर, परिचर्या सेवा, संगणक नियंत्रित यंत्रचालक, बँक ग्राहक संबंध अधिकारी, माहिती विश्लेषक, चित्ररचना, उपाहारगृह व्यवस्थापन, वाहतूक व साठवणूक व्यवस्थापन, विद्युत मंडल जोडणी उपकरण हाताळणी, संगणकीय विपणन, वैयक्तिक प्रशिक्षण, क्रीडा पोषण, बालसंगोपन व शिक्षण, वातानुकूलन व शीतकरण यंत्र दुरुस्ती, किरकोळ विक्री केंद्र व्यवस्थापन, दुचाकी दुरुस्ती, हॉटेल व्यवस्थापन आणि भ्रमणध्वनी दुरुस्ती आदी कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली.

कौशल्याधारित प्रशिक्षणातून उपलब्ध रोजगाराच्या संधी, विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे स्वरूप आणि प्रशिक्षणानंतरच्या रोजगाराच्या पर्यायांची माहिती युवक-युवतींना देण्यात आली. त्यामुळे सफाई सेवकांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबातील युवक-युवतींसाठी कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

> "सफाई सेवक शहर स्वच्छ ठेवण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी आणि सुरक्षिततेची काळजी घेणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. सफाई सेवकांचे आरोग्य जपणे म्हणजे शहराच्या आरोग्याची काळजी घेणे होय."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "आरोग्याबरोबरच, बदलत्या रोजगाराच्या गरजांनुसार युवक-युवतींना आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे. कौशल्यविकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होते. सफाई सेवकांच्या कुटुंबातील युवक-युवतींना त्यांच्या आवडी आणि क्षमतेनुसार कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत."
>
> -कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# 4 टक्के सवलतीची आज अखेरची संधी!

## ३० सप्टेंबरनंतर थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई; ६०१ कोटींचा मालमत्ता कर वसूल

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता करावरील ४ टक्के ऑनलाइन सवलतीचा लाभ घेण्यासाठी ३० सप्टेंबर हा शेवटचा दिवस आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ मधील दुसऱ्या तिमाहीसाठी ही सवलत देण्यात आली असून, मालमत्ताधारकांनी बुधवार, ३० सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ऑनलाइन मालमत्ता कराचा भरणा केल्यास सामान्य करामध्ये ४ टक्के सवलतीचा लाभ मिळणार आहे.**

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने आर्थिक वर्ष २०२६-२७ मधील दुसऱ्या तिमाहीसाठी मालमत्ताधारकांना ऑनलाइन मालमत्ता कर भरण्यावर ४ टक्के सवलत देण्यात येत आहे. १ जुलै २०२६ पासून सुरू असलेल्या या सवलतीचा लाभ घेण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ऑनलाइन कर भरण्याची मुदत आहे. आतापर्यंत ५० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी ४ टक्के सवलतीचा लाभ घेतला असून, ऑनलाइन कर भरण्याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अद्याप मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता तातडीने ऑनलाइन पद्धतीने कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, १ एप्रिल २०२६ ते २९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत ४ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी तब्बल ६०१ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर संकलनाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, ऑनलाइनसह उपलब्ध विविध माध्यमांतून कराचा भरणा केला जात आहे. नागरिकांना घरबसल्या सुलभपणे कर भरता यावा आणि कर भरण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता राहावी, यासाठी महापालिकेकडून ऑनलाइन कर भरण्याच्या सुविधेला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.




> "मालमत्ता कर हा शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. नागरिकांनी ३० सप्टेंबरपूर्वी ऑनलाइन मालमत्ता कराचा भरणा करून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. नागरिकांनी वेळेत कर भरल्यास महानगरपालिकेला शहरातील पायाभूत सुविधा आणि विविध नागरी सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे शक्य होते. त्यामुळे नागरिकांनी कर भरण्याची आपली जबाबदारी पार पाडून शहराच्या विकासात सहभागी व्हावे."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या नागरिकांनी ३० सप्टेंबरपूर्वी कराचा भरणा करून महापालिकेच्या वसुली कारवाई टाळावी. ३० सप्टेंबरनंतर मोठ्या प्रमाणात थकीत असलेल्या औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर मालमत्तांवर नियमानुसार जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कारवाईची प्रतीक्षा न करता थकीत कराचा भरणा तातडीने करावा. तसेच, चालू कराचा ऑनलाइन भरणा करून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. वेळेत कर भरणे ही केवळ आर्थिक जबाबदारी नसून शहराच्या विकासात नागरिकांचा थेट सहभाग आहे."
>
> -सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मालमत्ता कर हा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असून, त्यातून शहरातील विविध नागरी सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि विकासकामांसाठी निधी उपलब्ध होतो. त्यामुळे मालमत्ताधारकांनी आपला कर वेळेत भरल्यास महापालिकेच्या विकासकामांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होते. नागरिकांनी आपली कराची जबाबदारी वेळेत पूर्ण करून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, मालमत्ता कराच्या थकबाकीदारांसाठी महापालिका प्रशासनाने कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. ३० सप्टेंबरनंतर मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकीत असलेल्या औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर थकीत मालमत्तांवर नियमानुसार जप्तीची कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्यामुळे दीर्घकाळापासून मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर आता कारवाईची टांगती तलवार आहे.

महापालिकेकडून थकबाकी वसुलीसाठी यापूर्वीही संबंधित मालमत्ताधारकांना कर भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही मोठ्या प्रमाणात थकबाकी कायम राहिल्यास संबंधित मालमत्तांवर नियमांनुसार जप्तीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे संभाव्य जप्तीची कारवाई, अतिरिक्त प्रशासकीय प्रक्रिया आणि इतर अडचणी टाळण्यासाठी थकीत मालमत्ता करधारकांनी आपली थकबाकी शक्य तितक्या लवकर भरावी, असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

४ टक्के सवलतीची मुदत ३० सप्टेंबरला संपत असल्याने मालमत्ताधारकांसाठी सवलतीचा लाभ घेण्याची ही अंतिम संधी आहे. त्यानंतर थकीत कराच्या वसुलीसाठी महापालिका प्रशासनाकडून अधिक कडक पावले उचलली जाणार असल्याने नागरिकांनी मुदतीपूर्वी कर भरण्याला प्राधान्य द्यावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लतादिदींच्या सुरांची मैफल; ज्येष्ठ कलावंतांची भावपूर्ण आदरांजली

» पुणे | प्रतिनिधी

**भारतरत्न गानकोकिळा स्व. लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपळे सौदागर येथील अल्कोह सोसायटीमधील ज्येष्ठ नागरिक कलावंतांनी सदाबहार हिंदी गीतांचे सादरीकरण करत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. सोमवार (दि. २८) रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत सोसायटीच्या योगा गार्डनमध्ये हा विशेष सुरेल कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमात बाबासाहेब काळे, रमेश दुसाने, सुरेश तांबोळी, सुरेश बिरारी, रमेश चांडगे आणि खत्री यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी लता मंगेशकर यांच्यासह किशोर कुमार, मोहम्मद रफी, हेमंत कुमार, मुकेश, जगजीत सिंग आणि भूपेंद्र यांच्या गाजलेल्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले.



"याद आ रही है", "ये नयन डरे डरे", "होठों से छू लो तुम", "जाने कहाँ गये वो दिन", "वो जब याद आये बहुत याद आये", "पुकारता चला हूँ मैं", "फूलों के रंग से दिल की कलम से", "कहीं दूर जब दिन ढल जाए" आणि "ऐ मेरे वतन के लोगो" यांसारख्या अजरामर गीतांनी उपस्थित रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रत्येक गीतातून जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील आठवणींना उजाळा मिळाला.

लता मंगेशकर यांनी भारतीय चित्रपटसृष्टीच्या संगीत क्षेत्राला दिलेले अमूल्य आणि अतुलनीय योगदान आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त गीत-संगीताच्या माध्यमातून त्यांना मानवंदना देण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याची भावना यावेळी ज्येष्ठ नागरिक कलावंतांनी व्यक्त केली.

या सुरेल मैफलीमुळे अल्कोह सोसायटीसह परिसरातील नागरिकांना जुन्या अजरामर गीतांचा आनंद घेण्याची आणि आपल्या आठवणींना उजाळा देण्याची अनोखी संधी मिळाली. ज्येष्ठ नागरिक कलावंतांच्या उत्स्फूर्त सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.